# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११६/११५ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल:, registrar@sus.ac.in eligibility@sus.ac.in

NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

पात्रता विभाग


जा.क्र.पुअहोसोविसो/पात्रता विभाग /परिपत्रक क्र.१२/२०२०-२१/ 475 दिनांक : 15 JAN 2021

प्रति,

मा. प्राचार्य / संचालक,

सर्व संलग्नित पदव्युत्तर महाविद्यालये व विद्यापीठ संकुल

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय :** पात्रता शुल्क व आवश्यक कागदपत्रे स्विकारण्याच्या तारखांमध्ये वाढ करणेसंदर्भातील सुधारीत परिपत्रकबाबत...

**महोदय, / महोदया,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी महाविद्यालयातील अभ्यासक्रमासाठी प्रवेशीत विद्यार्थ्यांचे पात्रतेचे शुल्क व आवश्यक कागदपत्रे विभागात जमा करण्यासाठी चालु शैक्षणिक वर्षाकरीता पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी खालीलप्रमाणे तारखांना मुदत वाढ देण्यात येत आहे.

<table>
<tr><th>अ क्र</th><th>तपशील</th><th>शुल्क</th><th>विहित मुदत</th><th>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ क्षेत्रातील पदवीधर विद्यार्थ्यांना</th><th>अन्य विद्यापीठाच्या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना (महाराष्ट्रातील)</th><th>अन्य विद्यापीठ क्षेत्रातील पदवीधर (महाराष्ट्राबाहेरील व भारतातील )</th><th>परदेशी / अनिवासी भारतीय विद्यार्थ्यांना</th></tr>
<tr><td rowspan="3">२.</td><td rowspan="3">पदव्युत्तर अभ्यासक्रम एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., एल.एल.एम., एम.एस डब्लु, पी.जी.डी.सी.ए, डी.बी.एम., PG.Diploma in Dietetics and Nutrition</td><td>नियमित शुल्क</td><td>१५ फेब्रुवारी, २०२१</td><td>५०/-</td><td>१५०/-</td><td>३००/-</td><td>५००/-</td></tr>
<tr><td>विलंब शुल्क</td><td>२६ फेब्रुवारी, २०२१</td><td>५०+५०=१००/-</td><td>१५०+५०=२००/-</td><td>३००+१००=४००/-</td><td>५००+१००=६००/-</td></tr>
<tr><td colspan="6">विद्यार्थ्यांच्या नावांची यादी, मॅंडेट कॉपीज, invoice receipt, महाविद्यालयाचे पत्र, Appendix V व सुधारीत Appendix-II मधील कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या प्रती eligibility@sus.ac.in या ई-मेलवर दि.३ मार्च, २०२१ पूर्वी पाठवाव्यात (कोणत्याही महाविद्यालयीन कर्मचाऱ्याने सदर नस्ती देण्यासाठी व्यक्तिशः विद्यापीठात येवू नये.)</td></tr>
</table>

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या नावांची यादी, मॅंडेट कॉपीज, invoice receipt, महाविद्यालयाचे पत्र, Appendix V यांच्या मुळ प्रती व सुधारीत Appendix- II मधील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती घेवून विद्यापीठात १० मार्च, २०२१ रोजी व्यक्तीशः येवून जमा करावीत. सदर तारखे नंतर कोणत्याही महाविद्यालयांच्या कागदपत्रांचा स्विकार केला जाणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

तसेच संकुलातील पात्रता विषयी काम करण्याऱ्या कर्मचाऱ्याना आदेशान्वये कळविण्यात येते की, सध्याच्या कोरोना परिस्थितीत विद्यार्थ्यांची गर्दी टाळण्यासाठी सदर शुल्क संबंधीत संकुलांच्या लिपीकाने एकत्रीत रित्या एक दिवसा आड समक्ष येवून वित्त व लेखा विभागात विद्यार्थ्यांचे भरणा रोखीने करुन संबधीत विद्यार्थ्यांच्या नावाचे चलन करुन घ्यावे.

**महाविद्यालयाने /विद्यापीठ संकुलांनी विद्यापीठात सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे ( सुधारीत Appendix- II)**

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>अभ्यासक्रमाचे नाव</th><th>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ क्षेत्रातील अन्य विद्यापीठाच्या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना (महाराष्ट्रातील /महाराष्ट्राबाहेरील व भारतातील ) पदवीधर विद्यार्थ्यांची नस्ती मध्ये जोडण्यात येणारी पात्रतेसाठी आवश्यक कागदपत्रे</th></tr>
<tr><td>१</td><td>पदव्युत्तर अभ्यासक्रम एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., एल.एल.एम., एम.एस डब्लु, पी.जी.डी.सी.ए, डी.बी.एम., PG. Diploma in Dietetics and Nutrition</td><td>१) पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण असलेले गुणपत्रकाची साक्षांकित प्रत<br>२) महाविद्यालयातील/संकुलातील प्रवेशीत विद्यार्थ्यांची पात्रता शुल्क भरलेली पावतीची प्रत</td></tr>
</table>

महाविद्यालयाने विद्यापीठ संकुलांनी सर्व Appendix च्या अधिक माहितीसाठी प्रस्तुत विभागाचे दि. २० ऑगस्ट, २०२० जा. क्र. पुहसोसोविसो/पात्रता विभाग/२०२०-२१/ ७२३९ परिपत्रक क्र. १ चे अवलोकन करावे. सदरचे परिपत्रक हे विद्यापीठ su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर admission & eligibility या मथळ्याखाली eligibility या सदरात उपलब्ध आहे.

तरी वरील तारखांप्रमाणे सर्व पदव्युत्तर महाविद्यालयांनी व संकुलांनी कार्यवाही करावी. सदरचे परीपत्रक हे पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निर्गमीत करण्यात आले आहे.

कळावे.

आपला विश्वासू,

( डॉ. वि.भा.घुटे )
प्र. कुलसचिव

सूचना : १) वरील नमुद केलेल्या तारखांमध्ये जर दिलेलया दिनांकास सार्वजनिक सुट्टी / रविवार किंवा दुसरा किंवा चौथा शनिवार येत असेल तर त्या तारखेच्या पुढील कामकाजाचा दिवस ग्राहय धरण्यात येईल.

प्रत:-

१. पी.जी.प्रवेश विभाग
२. संलग्नता विभाग
३. परीक्षा विभाग (संगणक केंद्र)
४. वित्त व लेखा विभाग
५. शुल्क समिती
६. एम.के.सी.एल. विभाग